**<u>प्रेस नोट</u> दि.२८/०५/२०१९**

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे**

**<u>ज्येष्ठ नागरिकाची कौटुंबिक वादातून होणाऱ्या त्रासातून मुक्तता</u>**

कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात ज्येष्ठ नागरिक नामे राज रतन मसंद, वय ६८ वर्षे, रा. फ्लॅट नं.८/११, अतुर पार्क, नेलर रोड, पुणे हे त्यांची पत्नी रंजिता व मुलगा स्काय वय २७ वर्षे असे राहण्यास असून त्यांचे अमेरिकामध्ये व्यवसाय आहे. त्या तिघांमध्ये नेहमी घरगुती वाद होत होते.

दि.२३/०५/२०१९ रोजी ज्येष्ठ नागरिक राज रतन मसंद यांना त्यांचा मुलगा नामे स्काय याने हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देवून घरातून बाहेर काढले होते. त्यामुळे ते घाबरून पुना क्लब येथे राहावयास होते. दि.२५/०५/२०१९ रोजी ज्येष्ठ राज रतन मसंद, वय ६८ वर्षे हे कोरेगाव पार्क पो.स्टे. येथे आले. घडला प्रकार त्यांनी सांगितला. त्यावर आम्ही श्री.एम. के. बहाद्दरपुरे व त्यांचे स्टाफचे मदतीने मुलगा नामे स्काय व ज्येष्ठ नागरिका राज रतन मसंद यांची पत्नी रंजिता कौर यांना कोरेगाव पार्क पो.स्टे. येथे बोलावून घेतले. त्यांना योग्य प्रकारे काऊन्सिलींग केले व त्यांचे एकमेकांचे मनातील गैरसमज दूर केले. मुलगा नामे स्काय याने त्याचे हातून झालेल्या चुकीबाबत वडिलांची माफी मागितली व मुलाने वडिलांचे हातात हात मिळवून वडिलांना प्रेमाने मिठी मारली. अशा प्रकारे काऊन्सिलींग केल्यामुळे मुलगा स्काय यास ज्येष्ठ नागरिक राज रतन मसंद यांना पुन्हा त्यांचे घर परत मिळाले आहे व त्यांचे घरात होणारा कौटुंबिक वाद संपलेला आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे